वागळे वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वा.नियंत्रण अधि./ ७२६ /२०२६ दि. २५/०६/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत लीव फिट वेलनेस सर्व्हीसेस कंपनी यांचेवतीने दि.२८/०६/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वा. ते ०९:३० वाजेपावेतो **'मॅरेथॉन'** स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदरची स्पर्धा कोरम मॉल कडुन – वर्तकनगर – उपवन तलाव – पलायादेवी मंदिर – ओम साई मेडीकल – द केव ट्रक हॉटेल डावीकडे वळुन – पवारनगर रोड मार्गे जाणार आहे. त्यामुळे वाहतूक पुर्णपणे बंद करुन इतर मार्गाने वळविण्यात येणार आहे. त्यामुळे स्पर्धेच्या कालावधीत सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** कोरस टॉवर – लोकमान्य पाडा नं.१, आई माता चौक या परीसरातुन वर्तकनगरकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **वर्तकनगर नाका येथील सायकल स्टॅड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही कोरस टॉवर समोरील अपोलो फ्यूसी मेडीकल येथुन डावीकडे वळुन पुढे लक्ष्मीपार्क सोसा., मार्गे पुढे सरळ जावुन शास्त्रीनगर नाका चौकातुन डावीकडे वळुन आशावरी बिल्डीग येथुन इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** समता नगर परीसरात राहणारे रहिवाशी यांना **श्री. जैन ट्रेर्डस् दुकान, रेमंड गेट समोरील (समता नगर कट)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही समता नगर – देव अशोका बिल्डीग समोरुन डावीकडे वळुन – रामचंद्र नगर – नितीन जंक्शन येथुन इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**३)** नितीन जंक्शन कडुन कोरम मॉल सर्व्हिसरोडने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दर्यासागर हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	नितीन जंक्शन कडुन कोरम मॉल सर्व्हिस रोडने जाणारी सर्व वाहने ही नितीन जंक्शन येथील स्लीप रोडने जातील.
पर्यायी मार्ग –	माजिवाडा व खोपट कडुन कॅडबरी ब्रिज खालुन समतानगर येथे जाणारी सर्व वाहने ही नितीन जंक्शन ब्रिजखालुन – रोड नं.३३ ने देव अशोका बिल्डीग येथुन उजवीकडे वळुन पुढे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २८/०६/२०२६ रोजी सकाळी ०५:०० ते ११:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.